**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**

Central Training & Placement Office,
University Campus,
Aurangabad-431 004 (M.S.) India

NAAC Accredited by 'A' Grade

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**

ट्रेनिंग व प्लेसमेंट कार्यालय
विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद - ४३१ ००४ (म.रा.) भारत

E-mail : tpo@bamu.ac.in
Mobile No. 9011000666

फॅक्स क्र. : २४०३३३५
टेलिफोन : ०२४० - २४०००५७
वेब साईट : www.bamu.ac.in

जा. क्र. विरोवस्वरोमाका / २०१६- १७/१३६

दि. ०१/०२/२०१७

परिपत्रक क्र. २ रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय / प्लेसमेंट सेल / २०१६- १७

# परिपत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठातील सर्व विभागप्रमुखांना सुचित करण्यात येते की विद्यापीठातील नायलेट (NIELIT) या संस्थेमध्ये केंद्र सरकारच्या नॅशनल करिअर सर्व्हिसेस (NCS) या उपक्रमांतर्गत "मॉडेल करिअर सेंटर"ची (MCC) स्थापना करण्यात आली आहे. विद्यापीठातील या मॉडेल करिअर सेंटरच्या माध्यमातून संपूर्ण देशात उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधी तसेच विविध कौशल्य विकासाचे मार्गदर्शन इ. सर्व विद्यार्थ्यांना विनामूल्य दिले जाते.

या मॉडेल करिअर सेंटरच्या तसेच प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकरिता अनेक उपक्रम राबवले जातात. त्यात टी. सी. एस. ट्रेनिंग, इन्फोसिस ट्रेनिंग, करिअर संदर्भातील मार्गदर्शन कार्यशाळा तसेच जॉब फेअर इ. संदर्भात ठोस पाऊले उचलण्यासाठी तसेच या सर्व योजनांचा फायदा विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी सर्व प्राचार्य अथवा प्राचार्यांचे प्रतिनिधी तसेच प्लेसमेंट समन्वयक यांची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अथवा प्राचार्यांचे प्रतिनिधी तसेच प्लेसमेंट समन्वयक असे दोन प्रतिनिधी आपल्या महाविद्यालयातून / विद्यापीठातील विभागातून उपस्थित राहणे आवश्यक आहे. बैठकीसंदर्भातील तपशील परिपत्रकाच्या पुरवणी क्र. १ वर दिला आहे.

अधिक माहितीकरिता डॉ. गिरीश काळे (९०११०००६६६), प्लेसमेंट ऑफिसर, तसेच श्री. लक्ष्मण (९४०४४०२२४५), मॉडेल करिअर सेंटर चे समन्वयक यांच्याशी विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, विद्यापीठ परिसर येथे संपर्क साधावा.

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद ४३१ ००४ )(
संदर्भ: - विरोवस्वरोमाका / विभाग / २०१६/ 136 )(
दिनांक: - ०१/०२/२०१७ )(

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ

या परिपत्रकाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी : -

१) सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२) सर्व विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगबाद.